परिशिष्ट

(नमुना २)

जा.क्र./शिविप्रा/खाशा/शाळामान्यता/९४४९/२०२४
कार्यालय,शिक्षण विभाग (प्राथ.) जि.प.वाशिम
दिनांक :- ०६/०५/२०२४

दुरध्वनी : ०७२५२ २३१०५२

ई मेल : ssawashim@yahoo.com

---

प्रति,

अध्यक्ष
दि. आर्य शिक्षण संस्था, रिसोड

विषय :- **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २००९ च्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम ११ पोटनियम (४) अन्वये शाळांना आर.टी.ई. मान्यता प्रमाणपत्र देणेबाबत.**

आपल्या दिनांक १२/१०/२०२३ च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळेशी केलेल्या प्रत्रव्यवहार/शाळेची केलेली तपासणी या आधारे,

मी, शिक्षणाधिकारी प्राथमिक, जिल्हा परिषद, वाशिम ०१.०४.२०२२ ते ३१.०३.२०२५ या कालावधीसाठी इयत्ता ०१ ते ०७ करीता **सनराईज इंग्लिश स्कुल, रिसोड ता. रिसोड** या शाळेस आर.टी.ई. मान्यता देत आहे.

*__वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पुर्ततेच्या अधीन आहे:__*

१) ही मान्यता पुढे वाढणार नाही.
२) शाळ, बालकांच्या मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अभिनियम २००९ (सहपत्र--१) आणि बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अभिनियम २००९ (सहपत्र २) च्या तरतुदींशी बांधील राहील.
३) शाळा इयत्ता १ ली मध्ये मान्य विद्यार्थी संख्येच्या किमान २५ टक्के शेजारच्या परिसरातील दुर्बल घटकातील आणि प्रतिकुल गटातील बालाकांना प्रवेश देईल आणि त्यंचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत शिक्षण देईल. हाच निकष पूर्वप्राथमिक वर्गात प्रवेश देतांना पाळला जाईल.
४) परिच्छेद ३ मध्ये नमुद बालकांच्या खर्च कलम १२ (२) प्रमाणे प्रतिपुर्तता केली जाईल. अशा प्रतिपूर्तीसाठी शाळा स्वतंत्र बँक खाते उघडेल.
५) शाळा/संस्था प्रवेशासाठी कोणत्याही प्रकारे, कॅपिटेशन फी आकारणार नाही आणि बालक अथवा पालकांना छाननी प्रक्रियेनी सक्ती करणार नाही.
६) कोणत्याही बालकास वयाचा दाखला नाही म्हणून शाळा प्रवेश नाकारणार नाही, अथवा लिंग, धर्म, जात, जन्म ठिकाण या कारणावर प्रवेश नाकारणार नाही.
७) शाळा पुढील बाबींची दक्षता घेईल. :
एक) कोणतेही बाकल कोणत्याही वर्गात नापास/थोपविले जाणार नाही अथवा त्याने प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेबाहेर हाकलले जाणार नाही.
दोन) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा होणार नाही वा मानसिक छळ केला जाणार नाही.
तीन) प्राथमिक शिक्षण पूर्ण करणाऱ्या प्रत्येक बालकास सार्वजनिक बाहय परिक्षेस उत्तीर्ण होण्याची अट असणार नाही.
चार) प्राथमिक शिक्षणपूर्ण करणाऱ्या प्रत्येक बालकास नियम २३ खाली विहीत केलेले प्रमाणपत्र दिले जाईल.
पाच) अभिनियमाच्या तरतुदीनूसार अपंग/विशेष गरजा असणारे बालकांचा समावेश केला जाईल
सहा) अभिनियमाच्या कलम २३ (१) मध्ये विहीत केल्यानुसारच किमान शैक्षणिक अर्हता असलेल्या शिक्षकांचीच नेमणूक केल्या जाईल. पुढे असे की, ज्या शिक्षकांनी या अधिनियमांच्या अमंलबजावणी तारखेस जर किमान अर्हता प्राप्त केलेली नसेल, तर ५ वर्षांच्या कालावधीत ते विहीत किमान अर्हता संपादन करतील.
सात) शिक्षक कलम २४ (१) नूसार विहीत कर्तव्ये पार पाडतील.
आठ) शिक्षक खाजगी शिवकण्या घेणार नाहीत.
८) उचित प्राधिकरणाने विहीत केलेला अभ्यासक्रम आमलात आणेल.

९) कलम १९ मध्ये विहीत केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध सोयीच्या प्रमाणात विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्या जाईल.

१०) शाळा कलम १९ मध्ये विहीत सर्व निकष,मानके याप्रमाणे सर्व बाबींचा दर्जा ठेवेल. मागील तपासणी अहवालानुसार शाळेत उपलब्ध सोयीचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | शाळा परिसराचे क्षेत्रफळ | १८७८१ चौ.मी. |
| २ | एकूण बांधकाम | ११०८६.१६ चौ.मी. |
| ३ | क्रिडांगणाचे क्षेत्रफळ | ७४५१.२८ चौ. मी. |
| ४ | वर्ग खोल्या संख्या | १९ |
| ५ | मुख्याध्यापक/कार्यालय/स्टोअरसाठी खोली | आहे |
| ६ | मुले व मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह | आहे |
| ७ | पिण्याच्या पाण्याची सोय | आहे |
| ८ | मध्यान्ह भोजन शिजविण्यासाठी स्वंयपाकघर | --- |
| ९ | अडथळाविणा प्रवेश/वावर/सुविधा (RAMP) | आहे |
| १० | अध्ययन अध्यापन साहित्य /क्रीडा साहित्य/वाचन साहित्य | आहे |
| ११ | विद्युतीकरण | आहे |
| १२ | सरक्षण भिंत /तारेचे कुंपन | आहे |

११) मान्यता नसलेले वर्ग तुकडया शाळेत अथवा शाळेच्या नावाखाली परिसराबाहेर चालविले जाणार नाही.

१२) शाळा इमारत व इतर बांधकामे केवळ बालकांच्या शिक्षण/कौशल्य विकास या करीताच वापरत राहील.

१३) शाळेचे संचालन सोसायटी रजिस्ट्रेशन (१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० नुसार केलेले असेल

१४) शाळा कोणा एका व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसमुहाच्या किंवा अन्य फायद्याकरीता चालविली जाणार नाही.

१५) शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून तपासले जातील. लेखापरिक्षण केले जातील आणि नियमानुसार योग्य असे लेखा तक्ते तयार केले जातील आणि नियमानुसार योग्य असे लेखा तक्ते तयार केले जातील. त्याची एक प्रत जिल्हा शिक्षणाधिकाऱ्याकडे दरवर्षी पाठवावी लागेल.

१६) शाळेला २७०६०५०८९३१ हा मान्यता संकेतांक दिला आहे. त्याची नोंद घ्यावी व पुढील पत्रव्यवहारात त्याचा वापर न चुकता करावा.

१७) शाळा या अधिनियमाची उत्तरदायीत्व पूर्ण करण्यासाठी आणि सतत मान्यतेच्या अटी पूर्ण करण्याच्या दृष्टिने आवश्यक ते अहवाल माहिती शिक्षणसंचालक/जिल्हा शिक्षणाधिकारी यांनी मागितल्यानुसार पुरविल आणि राज्य सरकार/स्थानिक प्राधिकरण यांच्या आदेशाचे पूर्ण पालन करील.

१८) शाळेच्या संचालका संदर्भात सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था नोंदणी नियम १९५० अंतर्गत नुतनीकरण केल्याबाबत खातरजमा करण्यात यावी.

१९) इतर अटी परिशिष्ट नमुना (३) प्रमाणे सोबत जोडले आहे.

२०) शिक्षण विभाग महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णयाची अंमलबजावणी करावी लागेल तसेच विभाग मागील ती माहिती वेळोवेळी पुरवावी लागेल.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, वाशिम

प्रतिलीपी :–

गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती रिसोड यांना माहितीकरीता रवाना.

6.5.24

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, वाशिम